महाराष्ट्र शासन, राज्य कौशल्य,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (MSBSVET) मान्यताप्राप्त
Skill India कौशल भारत - कुशल भारत
आयटीआय ट्रेड कोर्सेसला प्रवेश सुरु आहे.
इलेक्ट्रीशियन कालावधी-२ वर्ष
कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (स्थापत्य अभियंता सहाय्यक) कालावधी-१ वर्ष
• गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर रजिस्ट्रेशन व लायसन्स काढता येते.
DMLT कालावधी-२ वर्ष
डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन
DMLT चे महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलला रजीस्ट्रेशन होते.
• केंद्र शासनाची अप्रेन्टीसशिप (Apprenticeship) लागू (Govt. of India)
अभिनव टेक्नीकल इन्स्टिट्युट रेल्वे स्टेशन जवळ, ZP रोड, वाचनालय समोर, जळगांव मो.-9423488174 ,7040416582

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २८ । अंक ११ । शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५

## संपादकीय

### आकडेवारी अन् जबाबदारी

सरकारी आरोग्य सेवेतील उणीवांचे माध्यमात अधूनमधून धिंडवडे निघत असले तरी ग्रामीण भागातील लोकांचा फार मोठा टक्का आरोग्यसेवेसाठी सरकारी आरोग्य सेवेवरच अवलंबून असतो. किरकोळ आजारांसाठी सुद्धा त्यांना सरकारी दवाखान्यांचाच आधार असतो. ते अधोरेखित करणार्या अहवालाविषयीचे वृत्त माध्यमात नुकतेच प्रसिद्ध झाले. ग्रामीण भागातील सुमारे सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त महिलांची प्रसूती सरकारी रुग्णालयात होत असल्याचा निष्कर्ष सरकारी अहवालात नमूद असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. देशाच्या रजिस्ट्रार जनरलच्या २०२३ च्या नमुना नोंदणी प्रणाली अहवालात यासंदर्भात अजून निरीक्षणे नमूद असल्याचे त्या वृत्तात म्हटले आहे. केंद्राच्या मदतीने राज्यात सरकारी पातळीवर गर्भार आणि प्रसूती झालेल्या मातांना अनेक सुविधा मोफत पुरवल्या जातात हे खरे. उदाहरणार्थ, महिलांना मोफत औषधे व इतर साहित्य पुरवठा, मोफत निदान, प्रसूती झालेल्या मातेस मोफत आहार, मोफत रक्तसंक्रमण, आरोग्य संस्था ते घर यादरम्यान मोफत वाहन सेवा इत्यादी. तरीही प्रसूती हा महिलेसाठी अत्यंत संवेदनशील विषय असतो. प्रसूती दरम्यान गंभीर अडचणी निर्माण झाल्या तर आई आणि बाळ दोघांच्याही जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्या अर्थाने प्रसूती हा त्या महिलेचा पुनर्जन्मच मानला जातो. तरीही महिला आणि त्यांचे कुटुंबीय सरकारी आरोग्य सेवेला प्राधान्य देत असतील तर त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देणे हे सरकारचे कर्तव्यच आहे. हे झाले गर्भार महिलांचे. याशिवाय राज्यस्तरावर सामान्यतः विविध आरोग्य योजनांतर्गत गरजूंच्या आवश्यक शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. विविध वयोगटांसाठी आरोग्य मोहिमा सरकार अधूनमधून राबवते. त्याअंतर्गत अनेक तपासण्या आणि गरजूंवर मोफत उपचार केले जातात. तथापि, अनेक सेवा आणि सुविधा नागरिकांना मोफत उपलब्ध करून दिल्या म्हणजे सरकारची जबाबदारी संपत नाही. केवळ पर्याय नाही म्हणून नव्हे तर दर्जेदार म्हणून लोकांनी सरकारी आरोग्य सेवेकडे पाहावे, ती सेवा त्यांना विश्वासार्ह वाटावी यासाठी प्रयत्न पान १ वर

### केळी भाव

नवती (१) : 1425
नवती (२) : 1225

### मिरचीकोथी




# मतचोरीचा पुरावा देणारच!

## राहुल गांधी यांचा रायबरेलीत मोदी सरकारवर हल्लाबोल

**रायबरेली ।** लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी रायबरेली दौऱ्यादरम्यान सत्ताधारी भाजपवर पुन्हा निशाणा साधला आहे. देशभरात वोट चोर, गद्दी छोड अशी घोषणा घुमत आहे. आणि हीच खरी वस्तुस्थिती आहे की, सरकारं मत चोरुन स्थापन केली जात आहेत, असा गंभीर आरोप खासदार गांधींनी पुन्हा केला आहे. तर त्यांनी वोटचोरीविरोधात पुन्हा आक्रमक पवित्रा घेतला आहे.



राहुल गांधींनी म्हटले की, आम्ही लवकरच तुमच्यासमोर स्फोटक पुरावे ठेवणार आहोत. देशभरात वोट चोर, गद्दी छोड असा नारा घुमत आहे. हीच खरी परिस्थिती आहे की, सरकारे लोकशाही मार्गाने नव्हे तर मतचोरी करून निर्माण होत आहेत. त्यामुळे हिंदुस्थानच्या तरुणांनो, आमचे काळजीपूर्वक ऐका. आम्ही तुम्हाला हमीसह पुरावे देणार आहोत.

भाजपवर तिखट वार करत ते म्हणाले की, भाजपचे लोक चिडत आहेत. पण आम्ही त्यांना सांगू इच्छितो की, उत्तेजित होऊ नका. कारण जेव्हा हायड्रोजन बॉम्ब फुटेल, तेव्हा सर्व काही साफ होऊन जाईल.राहुल गांधींनी दावा केला आहे की, या कथित मतचोरीबाबतचे ठोस पुरावे लवकरच जनतेसमोर मांडले जातील. यामुळे देशभरातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे आहेत.

रायबरेलीच्या दौऱ्यात राहुल गांधी यांनी प्रजापती समाजाच्या परिषदेलाही संबोधित केले. यावेळी त्यांनी थेट भाजप आणि आरएसएसवर टीकास्त्र डागले. ते म्हणाले, देशातील ९० टक्के जनता ही ओबीसी, दलित आणि आदिवासी समाजाची आहे. पण भाजप-आरएसएस यांना ही जनता कधीच पुढे जाऊ नये, असेच ते इच्छितात. राहुल गांधी यांनी पुढे आरोप केला की, हे लोक अशी व्यवस्था निर्माण करू इच्छितात की, दलित गरीबीतच राहावेत आणि मोठे उद्योगपती जसे अंबानी आहेत तसेच वरच्या स्थानावर राहावेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ओबीसी असल्याचा दावा करतात, मात्र जातीय जनगणनेबाबत एकही शब्द उच्चारत नाहीत.



## विरोधी पक्षनेते प्रोटोकॉल पाळत नाही!

### राहुल गांधींविरोधात सीआरपीएफचे खरगेंना पत्र

**नवी दिल्ली ।** केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) ने विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यावर सुरक्षा प्रोटोकॉल तोडल्याचा आरोप केला आहे. याबाबत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून चिंता व्यक्त केली आहे. राहुल गांधी कुणालाही न सांगता मागील ९ महिन्यात ६ वेळा परदेश दौऱ्यावर गेलेत. या काळात ते इटली, व्हिएतनाम, दुबई, कतार, लंडन आणि मलेशिया दौरा केला असे त्यांनी सांगितले.

मल्लिकार्जुन खरगेंसह राहुल गांधींनाही हे पत्र पाठवले आहे. अशाप्रकारची चूक महत्वाच्या सुरक्षेला कमकुवत करते. त्याशिवाय यातून धोक्याचा सामनाही करावा लागू शकतो असे या पत्रात म्हटले आहे. याआधीही सीआरपीएफने हा मुद्दा उचलला होता. राहुल गांधी यांना एडवान्स सिक्युरिटी लाइजन कव्हरसह हाइएस्ट लेवलची झेड प्लस सिक्युरिटी आहे. झेड प्लस सिक्युरिटीत ५५ सुरक्षा जवान तैनात असतात. त्यात १० पेक्षा जास्त एनएसजी कमांडो असतात. त्याशिवाय इतर सीआरपीएफ आणि स्थानिक पोलीस असतात. येलो बुक प्रोटोकॉलनुसार उच्चस्तरीय श्रेणीतील सुरक्षा मिळालेल्या लोकांना त्यांच्या हालचालींबाबत सुरक्षा विंगला आधी सूचना द्यावी लागते. जेणेकरून पुरेसी व्यवस्था निश्चित केली जाईल. त्यात परदेश दौऱ्यांचाही समावेश असतो. सीआरपीएफचे व्हीव्हीआयपी सिक्युरिटी हेड सुनील जून यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहिले. त्यात राहुल गांधी त्यांच्या सुरक्षेला गांभीर्याने घेत नाहीत. बहुतांश वेळा ते कुणालाही न सांगता परदेश दौऱ्यावर जातात असे त्यांनी सांगितले. ३० डिसेंबर ते ९ जानेवारी ते इटलीत होते. १२ ते १७ मार्च व्हिएतनाम, १७ ते २३ एप्रिल दुबई, ११ ते १८ जून कतार, २५ जून ते ६ जुलै लंडन, ४ ते ८ सप्टेंबर मलेशियासारख्या परदेश दौऱ्यावर ते गेले होते.

## मित्र पक्षांच्या पालकमंत्र्यांना लगाम

**मुंबई ।** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील तीन जिल्ह्यांसाठी नेमलेल्या सह पालकमंत्र्यांवरील जबाबदारी निश्चित केली आहे. संबंधित जिल्ह्यातील जनतेच्या तक्रारींचा निपटारा करण्याची कामगिरी सह पालकमंत्र्यांवर सोपवून फडणवीस यांनी मित्र पक्षांच्या पालकमंत्र्यांना लगाम घातल्याची चर्चा आहे. या निर्णयाने मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशीष शेलार यांचे पंख कापण्यात आल्याचे बोलले जात आहे.



**सहपालक मंत्र्यांची जबाबदारी निश्चित**

फडणवीस यांनी मुंबई उपनगर, कोल्हापूर आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांसाठी सह पालकमंत्री नेमले आहेत. राज्यात सह पालकमंत्री नेमण्याची प्रथा २०१४ पासून सुरु झाली. जानेवारी महिन्यात मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी मंगल प्रभात लोढा आणि कोल्हापूर जिल्ह्यासाठी माधुरी मिसाळ यांना सह पालकमंत्री नेमण्यात आले होते. अलीकडच्या काळात वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांना बुलढाणा जिल्ह्याचे सह पालकमंत्री करण्यात आहे.

मात्र, या सह पालकमंत्र्यांची विवक्षित जबाबदारी निश्चित झाली नव्हती. त्यामुळे सरकार दरबारी सह पालकमंत्र्यांच्या कामाबाबत स्पष्टता नव्हती.

# मराठा समाजाला सरसकट आरक्षण नाही!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुनरुच्चार

**मुंबई ।** मराठा आंदोलनानंतर राज्य सरकारने काढलेला शासन निर्णय हा सरसकट आरक्षण देणार नाही. तर पुरावा तपासूनच आरक्षण मिळणार असल्याचा मुख्यमंत्री पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी येथे केला.



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत शासन निर्णय जारी केला. या शासन निर्णयावर ओबीसी समाजाच्या नेत्यांचा आक्षेप आहे. याशिवाय ओबीसी नेत्यांकडून न्यायालयात याचिका करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आज प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना फडणवीस म्हणाले, याचिका करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. आम्ही विचार करुन शासन निर्णय काढला आहे, कोणालाही सरसकट आरक्षण हा शासन निर्णय देत नाही. पुराव्याने जे कुणबी आहेत, त्यांनाच हा शासन निर्णय मदत करतो. मी ओबीसी समाजातील नेत्यांना सांगू इच्छितो, कोणालाही सरसकट आरक्षण दिलेले नाही. पुरावा तपासूनच आरक्षण मिळणार आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. ओबीसींच्या मुंबई मोर्चावर बोलताना, राजकीयदृष्टीने कोणाला काम करायचे असेल तर आपण थांबवू शकत नाही. मात्र, जोपर्यंत आमचे सरकार आहे तोवर आम्ही ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. नेपाळमधील अराजकतेवरुन विरोधकांनी केलेल्या टीकेलाही फडणवीसांनी यावेळी उत्तर दिले. अलिकडच्या काळात जो विरोधी पक्ष आहे, त्यांनी विरोधाची अशी पातळी गाठली आहे की ते आता देशविरोधी, व्यक्तीविरोधी भूमिका घेताना दिसत आहेत. विरोधी पक्षाने भूमिका घ्यायची असते. त्यांनी धोरणांचा, योजनांचा विरोध करावा. मात्र देशाचा विरोध त्यांनी करु नये, असा टोला फडणवीसांनी विरोधी पक्षाला नाव ना घेता लगावला.

### कर्नाटक सरकारचा निषेध

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी कर्नाटकातील काँग्रेस सरकारने घेतलेल्या निर्णयाचा निषेध करत पंडित नेहरुंच्या इतिहासाची आठवण करुन दिली. शिवाजी नगर मेट्रो स्टेशनचे नाव बदलून सेंट मेरी स्टेशन करणे याचा मी निषेध करतो. एकप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करण्याचे काम कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने केले आहे. या गोष्टीचे मला दु:ख आहे, असे ते म्हणाले. कर्नाटक सरकार शिवाजी महाराजांचा अपमान करत आहे. पण, शिवाजी महाराजांना अपमानित करण्याची परंपरा ही काँग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरु पंतप्रधान असण्यापासून आहे, असा इतिहास आहे. डिसकव्हरी ऑफ इंडिया हे पुस्तक नेहरुंनी लिहिले होते. त्यामध्ये त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलचे जे मत व्यक्त केले होते हे आपल्याला माहिती आहे, असे फडणवीस म्हणाले.

## खा.प्रशांत पडोळे अपघातातून बचावले

**भंडारा ।** भंडाऱ्याचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या वाहनाला गुरूवारी पहाटे ६ वाजताच्या दरम्यान भीषण अपघात झाला. नागपूर बायपासवरील उमरेड फाट्याजवळ एका ट्रकची त्यांच्या फॉर्च्युनर कारला धडक बसली. यात, खासदार पडोळे किरकोळ जखमी झाले असून त्यांच्या कारचे मोठे नुकसान झाले आहे.



दिल्ली येथे उपराष्ट्रपती पदाकरिता मतदान करून ते विमानाने मुंबईला पोहचले. तेथे कार्यालयीन काम पूर्ण केल्यानंतर आपल्या वाहनाने भंडाऱ्याकडे परतत होते. तेव्हा नागपूर बायपासवरील उमरेड फाट्याजवळ अचानक समोरून आलेल्या वाहनामुळे संतुलन बिघडले आणि जोरदार धडक बसली. डॉ. पडोळे यांच्यासह सर्व सहकारी सुखरूप आहेत.

अपघातानंतर स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. वाहन रस्त्याच्या कडेला हलवण्यात आले, पुढील चौकशी सुरू आहे. खासदार डॉ. पडोळे यांना किरकोळ जखमा झाल्या असून त्यांना तातडीने उपचार देण्यात आले.




**नवी दिल्ली ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी एस.डी.आर.एफ., एन.डी.आर.एफ., सी.आर.पी.एफ. व आपत्कालीन परिस्थितीचा सामना करणाऱ्या जवानांशी संवाद साधला.

## पाच संशयित दहशतवाद्यांना अटक

### आफताब अन् सुफियान मुंबईचे रहिवासी

**नवी दिल्ली ।** दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेल आणि केंद्रीय एजन्सींनी अनेक राज्यांमध्ये छापे टाकून ५ संशयित दहशतवाद्यांना अटक केली. संशयित दहशतवाद्यांकडून आयईडी बनवण्यासाठी वापरले जाणारे साहित्य देखील जप्त करण्यात आले आहे. पाच संशयितांपैकी दोन दिल्लीचे आणि प्रत्येकी एक मध्य प्रदेश, तेलंगणातील हैदराबाद आणि झारखंडमधील रांची येथील आहे. गट प्रमुख अशरफ दानिश रांची येथून आणि आफताब, सुफियान नावाच्या तरुणांना दिल्ली येथून अटक करण्यात आली आहे.हे दोघ मुंबईचे रहिवाशी आहेत. अशरफ दानिश भारतातून दहशतवादी मॉड्यूल चालवत होता. रांची येथील त्याच्या लपण्याच्या ठिकाणावरून एक देशी बनावटीचे पिस्तूल, काडतुसे, हायड्रोक्लोरिक ॲसिड, नायट्रिक ॲसिड, सल्फर पावडर, तांब्याचे पत्रे, बॉल बेअरिंग्ज, स्ट्रिप वायर्स, इलेक्ट्रॉनिक सर्किट्स, लॅपटॉप, मोबाईल फोन आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. आफताब आणि सुफियान हे मुंबईचे रहिवासी आहेत. स्पेशल सेलने मुंबईतील त्यांच्या लपण्याच्या ठिकाणांवरही छापे टाकले आहेत.

## अजित पवार यांनी घेतला महामंडळाचा आढावा

**मुंबई ।** इतर मागासवर्ग समाजाच्या कल्याणकारी योजनांना निधी मिळत नसल्याची तक्रार ओबीसी नेत्यांकडून केली जात असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी मंत्रालयात मराठा समाजासाठी गठीत करण्यात आलेल्या सारथीसह अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनांचा लाभ समाजातील योग्य आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचावा म्हणून विशेष काळजी घेण्यात यावी. या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने होऊन अधिकाधिक लाभार्थ्यांना त्याचा फायदा व्हावा, यावर भर देण्याचे निर्देश अजित पवार यांनी बैठकीत दिले. तसेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेच्या (सारथी) या संस्थेच्या योजनांचा आढावाही त्यांनी घेतला.

# गरियाबंदमध्ये रंगले एन्काऊंटर!

## एक कोटींचे बक्षीस असलेल्या कुख्यात बाळकृष्णसह १० नक्षलवादी ठार

**रांची ।** छत्तीसगडमध्ये १ कोटीचा इनाम असलेल्या नक्षलवाद्यांच्या म्होरक्यासह १० नक्षलवाद्यांना मारण्यात यश आले आहे. गरियाबंदमध्ये एन्काऊंटर सुरु आहे. नक्षलवाद्यांकडून थांबून थांबून गोळीबार सुरु आहे. मैनपूरच्या जंगलात नक्षलवाद्यांना सुरक्षा दलांनी घेरले आहे.




एसपी निखिल राखेचा यांनी चकमक सुरु असल्याचे सांगितले आहे. गुप्त सूचनेनंतर सुरक्षा दलांनी जंगलात लपलेल्या नक्षलवाद्यांना घेरले होते. या नक्षलवाद्यांत एक कोटींचा इनामी मोडेम बाळकृष्ण देखील असल्याचे समोर आले होते. यामुळे बुधवारी हे ऑपरेशन सुरु करण्यात आले होते. ओडिशा आणि छत्तीसगड सीमेवर बाळकृष्ण कुख्यात होता. त्याला मारण्यात यश आले आहे.

या कारवाईमध्ये राज्य पोलिस, केंद्रीय राखीव पोलिस दल आणि कोब्रा बटालियनच्या तुकड्यांचा समावेश होता. बालकृष्ण हा ओडिशा राज्य समितीचा वरिष्ठ सदस्य होता, त्याच्यावर १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. सतधार पुलापासून ८०० मीटर पुढे असलेल्या भागात ही चकमक सुरु होती. गुरुवारी सकाळच्या सुमारास नक्षलवाद्यांनी लावलेल्या आयईडीमुळे इन्स्पेक्टर दिवाण सिंग गुर्जर आणि कॉन्स्टेबल आलम मुनेश गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना एअरलिफ्ट करून रायपूरला नेण्यात येणार आहे.

## आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राचा अतिरिक्त कारभार

**मुंबई ।** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाल्याने महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. राष्ट्रपती भवनातून गुरुवारी याबाबतची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे आचार्य देवव्रत गुजरातसह महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची जबाबदारी सांभाळणार आहेत.



दरम्यान, उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांच्या उद्या होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीला जाणार आहेत. उपराष्ट्रपतींच्या शपथविधी सोहळ्याचे शिंदे यांना खास आमंत्रण देण्यात आले आहे. त्यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवारदेखील दिल्लीला जाणार आहेत.